# जडणघडण.......... एका मुक्त शिक्षण पध्दतीतली!

मी मुळचा खानदेशातील जळगाव जिल्ह्यातल्या ग्रामीण भागातला. पदवीपर्यंतचे शिक्षण तालुक्याच्या गावी झाले. इंग्रजी साहित्यात बी. ए. पूर्ण केले. त्यानंतर इंग्रजी साहित्य आणि माझा कधी संबंध आला नाही. (अर्थात पदवीच्या काळात तरी कुठे होता?) तोपर्यंत सामाजिक जाणीवांचा मनाला स्पर्शही झाला नव्हता.

युपीएससी सिव्हिल सर्विसेसची परीक्षा देऊन आयएएस बनण्याचा निश्चय करून मी पुण्याला गेलो. आयएएस बनण्यामागे सामाजिक प्रेरणांपेक्षा 'बंगला–गाडी–नोकरी–छोकरी' असं रोमँटिक ड्रीम आणि लाल दिव्याची गाडी, पावर, स्टेटस वगैरे गोष्टीच डोक्यात खच्चून भरलेल्या होत्या. पुण्यात गेल्यावर तिथल्या सांस्कृतिक, शैक्षणिक, वैचारिक वातावरणामुळे मी प्रभावित झालो. नवी नवी क्षितिजे दिसू लागली. मग आयएएस च्या तयारी पेक्षा वाचन, प्रवास, नाटकं, ट्रेकिंग, राजगडाच्या ४००० फुट उंचीवर रात्री एकटं झोपणे, सायकलिंग, योग, बाबा आमटे, कुमार सप्तर्षी, अविनाश धर्माधिकारी इ. व्यक्तींचा सामाजिक विचारांचा उगीचच मनावर परिणाम करवून घेणे वगैरे उचापती मला जास्त महत्त्वाच्या वाटू लागल्या आणि त्यामध्ये मी रमू लागलो. आयएएसची तयारी एक वर्ष पुढे ढकलली.

स्वत:ला जगण्याच्या विविध पातळींवर आजमावून–घासून पाहत होतो. त्यामुळे एकूणच जगण्याच्या झालेल्या कंडिशनिंगचा गंज कमी कमी होत गेला. मनात तयार झालेली सुखासीन जगण्याची जळमटे दूर होत गेली आणि सामाजिक जाणीवांना मनात आकार यायला सुरवात झाली.

या काळात माझ्या आयुष्यात काही डिप्रेशन्स सुद्धा आली. आंतरिक मुल्यव्यवस्था आणि प्रत्यक्ष जगणं यातली विसंगती मला अस्वस्थ करून टाकायची. भरपूर वेळ वाया घालवला. उगीचच इकडेतिकडे भरकटत राहिलो. नलीन पॅनच्या 'संसारा' फिल्ममधील बौद्ध भिक्षूला जीवन यथेच्छ भोगल्यानंतर प्रश्न पडतो...

> 'What is more important,
> satisfying one thousand desires
> or conquering just one?'

या काळातला माझा आंतरीक संघर्ष काहीसा असाच होता (अजूनही आहेच.) त्यातनंच मग स्वत:ला एकांतात कोंडून घेणे, मनातल्या विकारांना स्वैर सोडणे, लोणावळ्याच्या कैवल्यधाम इन्स्टिट्युट मध्ये योग शिकणे वगैरे उठाठेवी घडल्या. पुण्यात चाणक्य मंडलमध्ये असतांना प्रशासनात शिरुन समाज परिवर्तन असा एक मार्ग अविनाश धर्माधिकारी मांडत होते. ते माझ्या मनातल्या रोमॅंटीक ड्रीमशी सुसंगतही होते.

अशा संमिश्र अनुभवांच्या लाटांवर माझ्या आयुष्याची नौका हेलकावे खात असतांना मी निर्माणच्या प्रक्रियेत सहभागी झालो. निर्माणच्या प्रक्रियेत दृष्टी विशाल होत गेली आणि समाजपरिवर्तनाचे अनेक मार्ग दिसू लागले. हे 'द रोड लेस ट्रॅव्हल्ड' मनाला अधिक भिडायला लागले आणि जगण्याला एक वेगळी दिशा मिळाली–समाजप्रश्नांवर काम करत अर्थपूर्ण जीवन मला जगायचंय. कलेक्टर बनण्याचे माझे ड्रीम तितके डोळस नाही हे जाणवायला लागले. त्यातल्या अनेक मर्यादा सुध्दा दिसू लागल्या. म्हणून डोक्यातला मी आयएएस बनण्याचा विचार काही काळ स्थगित करण्याचे ठरविले.

जानेवारी महिन्यात झालेल्या निर्माण (१.४) शिबीराच्या शेवटाला फेलोशीप कार्यक्रमाबाबत चर्चा झाली. निर्माणच्या प्रक्रियेतील युवांना समाजप्रश्नांवर प्रत्यक्ष काम करत स्वत:साठी अर्थपूर्ण

जीवनाचा शोध घेता यावा म्हणून फेलोशीप कार्यक्रमाची कल्पना समोर आली. एका सुनियोजीत कार्यक्रमात काम करण्याची संधी मिळणार म्हणून मी या कार्यक्रमात सहभागी होण्यास उत्सुक होतो. हा कार्यक्रम एक ऑगस्ट २००८ ला सुरु होणार असं कळलं. माझ्याकडे भरपूर वेळ असल्याने मी एक ऑगस्टसाठी न थांबता डॉ. अभय बंग यांची परवानगी मिळवत पाच महिन्यांपूर्वी सर्च या संस्थेत कामास रुजु झालो.

फेब्रुवारीच्या मध्यास शोधग्रामला (सर्च संस्थेची वसाहत) पोहोचलो तेव्हा माँ दंतेश्वरी जत्रेची चर्चा–तयारी सुरु होती. माँ दंतेश्वरी ह्या माडीया गोंड आदिवासींच्या सर्वोच्च देवतेच्या नावाने सर्चमध्ये दरवर्षी जत्रा आयोजित केली जाते. या जत्रेचे प्रमुख वैशिष्ट्य असलेल्या आदिवासी संसदेत ३६ गाबातील आदिवासींचे प्रतिनिधी एकत्र मिळून आपल्या आरोग्य व विकासाविषयक कार्यक्रमाची आखणी करतात.

ही आदिवासी संसद मला विकेंद्रित लोकशाहीचे छोटे प्रतीक वाटली, जिथे निर्णय प्रक्रिया मूठभर भ्रष्ट सत्तापिपासूंच्या हाती केंद्रीत न होता सामान्य माणसाला स्वयंनिर्णयाचा अधिकार असतो. माँ दंतेश्वरी जत्रेत आदिवासींच्या पारंपारीक धार्मिक श्रद्धा जोपासत आदिवासी संस्कृतीचे जतन, खेळांद्वारे युवक युवतींचे संघटन व क्षमता विकास आणि आरोग्य व विकासविषयक कार्यक्रमाची आखणी असा सुंदर मिलाफ झाला होता.

To me it was a remarkable lesson of how traditional religious beliefs of a community could be channelized for its welfare. During my visit to Rajasthan, I observed how traditional wisdom of people about water conservation could be channelized to tackle the problem of water crisis.

संसदेत मलेरीया नियंत्रणासाठी मच्छरदाणीचा वापर, मच्छरांची पैदासकेंद्रे (पाण्याची डबकी) नष्ट करणे आणि योग्य औषधोपचार असा लोकसहभाचा त्रिसूत्री कार्यक्रम आखण्यात आला. त्यानंतर काही दिवसांनी अमेरिकेतला पब्लिक हेल्थचा शिक्षण घेतलेला जे. कॉम हा 'मच्छर स्पेशालिस्ट' तरूण मलेरीया नियंत्रणाच्या कामासाठी सर्चमध्ये आला. सर्चच्या कामाची हीच खासियत आहे. लोकसहभागातून समस्या सोडवण्यासाठी साधे व सरळ उपाय सर्च सुचवते. तसेच जागतिक पातळीवरील अद्ययावत ज्ञानाचा, वैज्ञानिक पद्धतींचा आपल्या कामात हमखास उपयोग करते.

जत्रेनंतर डॉ.अभय  बंग यांच्याशी माझ्या कामासंबंधी चर्चा झाली. क्लासरुममधील पोथीनिष्ठ थिअरीज मध्ये न अडकता ग्रामीण प्रश्नांचा अभ्यास प्रत्यक्ष ग्रामीण भागात राहून करायचा असं चर्चेत ठरलं. त्यासाठी गडचिरोली तालुक्यातल्या मुडझा या गैरआदिवासी गावात एक महिना पूर्णवेळ (मुक्काम ठोकून) राहिलो.

ग्रामीण प्रश्न समजून घेण्यासाठी लोकांसोबत होणारा संवाद सगळ्यात महत्वाचा ठरतो. तंबाखुयुक्त पदार्थांच्या सेवनाचा प्रश्न अभ्यासण्यासाठी  मुडझा गावात मी एक सॅंपल सर्वे केला. सर्वेसाठी गावातल्या ५१ कुटुंबांना मी भेटी महिन्याभर दिल्या. या भेटींचा असा परिणाम असा झाला की मला या ५१ कुटूंबांमध्ये मुक्त प्रवेश मिळाला. त्यामुळे मी लोकांशी व्यक्तिगत आणि कौटुंबिक पातळीवर चांगला संवाद साधू शकलो. तंबाखू सर्व्हे हे माझ्यासाठी संवादाचं  प्रभावी माध्यम बनले.

मुडझा गावात राहून ग्रामीण प्रश्नांचा अभ्यास करणे हा माझ्यासाठी एक अभिनव अनुभव होता. तसं बघायला गेलं तर खेडेगावात राहणे ही माझ्यासाठी नवी गोष्ट नव्हतीच. २० वर्षे मी माझ्या गावातच राहिलो होतो. पण शहरात राहून लठ्ठ पगाराची नोकरी करण्याची मानसिकता (शिक्षणपद्धतीची देणगी!) बनल्यामुळे गावगाडा, निसर्ग, शेती इत्यादींशी माझा फारसा संबंध येत नव्हता.

My eyes couldn't see rural problems as my mind had not the will to know them.

नंतरच्या काळात आयुष्यात प्रचंड अंतर्बाह्य ऊलथापालथ झाली आणि ग्रामीण प्रश्नांवर काम करण्याचा निश्चय मनात आकारास आला. या पार्श्वभूमीवर मुडझा गावातील अनुभव निश्चितच अभिनव होता. गावात एक महिना कसा गेला ते कळलंच नाही. लोकांचे भरभरून प्रेम मिळालं. आपण गावातल्या लोकांशी चांगला संवाद साधू शकतो हे याच काळात जाणवलं. 'व्हाईट कॉलर्ड' कंडीशनिंग पार धुतले गेले आणि ग्रामीण भागातच काम करण्याचा निश्चय अधिक दृढ झाला.

समाज प्रश्नांवर काम करणे वगैरे सोडा हो, आधी मला लोकांशी नातं जोडता येतं का हे तपासायला हवं. मुडझा गावात मला जाणवलेल्या लोकांच्या समस्यांचे स्वरूप आणि व्याप्ती तपासण्यासाठी गडचिरोलीतल्या इतर पाच गावांमध्ये मी फिरलो. समस्या सर्वत्र सारख्याच जाणवल्या. ग्रामीण भागातल्या माणसांविषयी या काळातली माझी काही निरीक्षणे पुढे मांडतो आहे.–

१. गावातली माणसं त्यांच्या समस्या, गरजांविषयी मोकळेपणाने आपल्याशी बोलतात.
२. गावातली रिकामी–खालीपीली (स्थानिक शब्द) माणसं पाहून हे लोक आळशी आहेत असं आपल्याला हमखास वाटते. पण महम्मद युनूस म्हणतात त्याप्रमाणे–
   It's a structural problem,not a personal problem.
   ग्रामीण समस्यांचे मूळ धोरणात्मक, संरचनात्मक बाबींमध्ये शोधत जायला हवे.
३. तरीही मला सतत वाटतं की निदान काही गोष्टी लोकं निश्चित करू शकतात ज्यामुळे समस्या काही अंशी तरी सुटतील. पण तसं होताना दिसत नाही.
४. इकडल्या गावांमध्ये बचत गटांमुळे महिलांचे काही प्रमाणात संघटन आणि सक्षमीकरण झाले आहे. काही गावांमधे तर बचत गटांच्या बायकांनी मिळून दारूबंदी घडवून आणली आहे.
५. शासकीय योजनांच्या बाबतीत लोक प्रचंड निराश, हतबल आहेत. साधा दाखला मिळवण्यासाठी देखील ते सरकारी कार्यालयात जायला कचरतात. तरीदेखील 'हे तर सरकारचे काम आहे, सरकारच काहीतरी करेल' अशी वृत्ती लोकांमधे दिसून येते.
६. गावातील कुटुंबे मोठ्या प्रमाणात विभक्त होत आहेत. मूलं लग्न झाल्या झाल्या कुटुंबातनं विभक्त होत आईवडिलांना वाऱ्यावर सोडून देतात.

दरम्यानच्या काळात सर्चमधील विविध उपक्रम जवळून बघता आले. ते खूप शिकवून गेले. नियमित आयोजित केल्या जाणाऱ्या सर्जिकल कॅम्प्स मध्ये अत्यल्प शुल्कात होणाऱ्या ऑपरेशन्समुळे स्थानिक लोकांना भरपूर फायदा होतो. पेशंट्सच्या फावल्या वेळेचा वापर ग्रामस्वच्छता, व्यसनमुक्ती, लैंगिक शिक्षण, इत्यादी बाबतीत शिक्षणासाठी करणे ही कल्पनाच झकास होती. ते प्रत्यक्ष बघणं हे सुद्धा एक थ्रील होतं. ऑपरेशन थिएटरमधील 'फजीऑलॉजिकल तोडफोड' आयुष्यात पहिल्यांदा बघतांना सुरुवातीला गांगरलो, नंतर मात्र मजाच आली.

सर्चच्या विविध टीम्सच्या वार्षिक कार्यक्रमांच्या नियोजनासाठी वापरली जाणारी Goal Analysis पद्धत फार उपयोगी आहे. सर्चच्या टीम्स आपपल्या वार्षिक कामांची आखणी स्वतः करतात, त्यासाठी कृतीकार्यक्रम ठरवतात व कामाच्या मूल्यमापनासाठी काही मापदंड निश्चित करतात. एकुणच या प्रक्रियेत खूप सखोल विचार करावा लागतो. कामाचे स्वरुप संदिग्ध न राहता स्पष्ट व निश्चित होते. कार्यकर्त्यांना आपल्या जबाबदाऱ्या नीट कळतात. शिवाय त्यांना sense of ownership and creative expression चं समाधान लाभतं. डॉ. अभय बंग यांच्याशी वेळोवेळी झालेल्या चर्चांचा भरपूर उपयोग झाला. त्यावर एक सविस्तर लेख लिहायला हवा.

या काळात एक गोष्ट मला सातत्याने प्रकर्षाने जाणवत राहिली की सामाजिक काम हे येरागबाळ्याचे काम नव्हे, येथे पाहिजे जातीचे! सोसवेल तेवढे काम करण्याचे समाजसेवा हे क्षेत्र नव्हे. इथे अत्यंत प्रोफेशनल पद्धतीने काम करण्याला गत्यंतर नाही. इथे अभ्यासातनं – अनुभवातनं –

स्वाध्याय करुन नवनवी कौशल्ये आत्मसात करावी लागतात. इथे वार्षिक परीक्षेची झंझट नसते कारण दररोजच परीक्षा असते. इथे तुकोबा म्हणतात त्याप्रमाणे 'रात्रंदिन आम्हां युद्धाचा प्रसंग' अशीच स्थिती असते.

नुकत्याच संपलेल्या निर्माण (२.१) शिबीराच्या शेवटाला आम्ही सगळ्यांनी एकमेकांचे हात हातात गुंफत 'हम होंगे कामयाब एक दिन' हे गाणं म्हटलं होतं. मला वाटतं त्या विशिष्ट 'एक दिन' ची वाट बघत बसायला आपल्याकडे वेळ उरलेला नाही. नाही तर आजची जबाबदारी उद्यावर सहज ढकलता येते. म्हणुन इथे 'हम होंगे कामयाब हर दिन' ॲप्रोचची (आणि अर्थातच कृतीची) गरज आहे.

आधीच्या पिढीतल्या सामाजिक कार्यकर्त्यांच्या तोंडून मी अनेकदा फुल टायमर, पूर्णवेळ – अर्धवेळ कार्यकर्ता वगैरे शब्द ऐकले आहेत. त्यामागे 'सामजिक कामाची खुमखुमी आणि चरितार्थाची हमी' असा व्यावहारिक विचार होता. याउलट याच पिढीतल्या काही कलंदरांनी आपल्या कामातनं दाखवून दिलं की सामाजिक काम आणि चरितार्थ असं अव्दैत साधता येते. फक्त त्यासाठी गरज आहे – Professional work for social change ॲप्रोचची. हे ज्यांना जमलं अशा एका कलंदर जोडप्याच्या प्रेमळ सहवासात – मार्गदर्शनाखाली मी काम करतो आहे हे मी माझं भाग्य मानतो.

मला वाटतं, पुढील काळात निर्माणला एक नवी परंपरा बांधायची आहे – Professional work for social change. या परंपरेला सगुण साकार रुप (Physical manifestations) देण्यासाठी व्यक्तिगत आणि सामुहिक पातळीवर तातडीने प्रयत्न व्हायला हवेत.

सध्या मी माझा स्वभाव, क्षमता आणि मुख्य म्हणजे लोकांची गरज लक्षात घेऊन रोजगार हमी योजना, माहितीचा अधिकार, ग्रामप्रशासन या issues वर लक्ष केंद्रित केले आहे. रोजगार हमी योजनेचा अभ्यास करतांना शासकीय यंत्रणेची (बेशरम) दिरंगाई आणि लोकांचा (लाजीरवाणा) अजाणतेपणा यांचा वारंवार प्रत्यय येत आहे. त्याबाबतीत तातडीने कृती करण्याची गरज आहे.

अर्थ शास्त्रामध्ये एक टर्म आहे – फिस्कल डेफिसिट. आजची खेडी 'नॉलेज डेफिसिट'' आहेत असं मला वाटतं. आजच्या ज्ञानयुगात गावांमध्ये अज्ञानाचा अंधकार आहे. याचा अर्थ हा नाही की गावातले लोक मूर्ख, अज्ञानी आहेत. वर्षानुवर्षे चालत आलेले पारंपारीक शहाणपण, अनकंडिशन्ड इंटेलिजन्स आजही गावात पहायला मिळतो मात्र आधुनिक जीवनशैलीच्या आक्रमणामुळे ते झाकोळले जात आहे, लुप्त होत आहे आणि नवं ज्ञान–ज्ञानाची साधने गावापर्यंत पोहोचत नाही.

गावातला अज्ञानाचा अंधार दूर करण्यासाठी गावागावात 'नॉलेज ॲक्टिविस्ट'' तयार करणे सगळ्यात महत्त्वाचे आहे. म्हणून शासकीय योजनांच्या लोकाभिमुख, स्वच्छ आणि पारदर्शक अंमलबजावणी साठी, शासकीय निर्णय प्रक्रियेत लोक सहभाग वाढवत participatory democracy राबवण्यासाठी माहितीचा, ज्ञानाचा प्रसार करत गावागावात नॉलेज ॲक्टिविस्ट तयार करणे हे मी माझे गडचिरोली जिल्ह्यातील कामाच्या संदर्भात आजचे 'लाइफ मिशन' मानतो.

गोपाल सुभाष महाजन
निर्माण फेलो,
सर्च, गडचिरोली
mahagopsu@gmail.com